# जास्वंद



अमेरिकेत प्रथम  आले तेव्हाची गोष्ट. मायामीला जाणार होतो. एअरपोर्टवर उतरलो तर समोरच्या बिल्डिंग वर मोठी पाटी दिसली.
Hibiscus Car Parking..
म्हटलं .. Hibiscus ? … म्हणजे ..
“आपलं जास्वंद !” …. अमेरिकेपर्यंत पोहोचलं!
एअरपोर्टवरून बाहेर पडल्यावर सुध्दा अनेक ठिकाणी अशी उंच आणि जास्वंदीच्या फुलांनी लगडलेली झाडे दिसली.

गणपतीला लाल फूल आवडते म्हणून पूजेत लाल जास्वंद हवेच. लहानपणापासून हे ऐकत आले होते. प्रथम पुस्तक हातात आले तेव्हा लाल रंग आणि पुढे लाल जास्वंद असे चित्र असे. त्यामुळे जास्वंद हे आपलेच, फक्त भारतात मिळते असे वाटायचे. पण तसं नाही. म्हणजे जास्वंदीला ऊन जास्त लागतं. १०डिग्रीच्या खाली, थंड प्रदेशात ते जगू शकत नाही.

पुराणातल्या ग्रंथात जास्वंदीचा “जपा कुसुम” असा उल्लेख आढळतो.

जपाकुसुम संकाशं काश्यपेयं महाद्युतिम्
तमोरीं सर्वं पापघ्नं प्रणतोस्मि दिवाकरम् !

म्हणजे जास्वंदीच्या (संस्कृतमध्ये जपा) फुलाप्रमाणे लाल रंग, कांती असलेल्या, कश्यप ऋषींच्या वंशात जन्मलेल्या अत्यंत तेजस्वी, अंधाराचा शत्रू, सर्व प्रकारची पापे नष्ट करणाऱ्या दिवाकाराला (सूर्याला) मी नमस्कार करतो.

नवग्रह स्तोत्र हे व्यास ऋषींनी रचले आहे. त्यातला हा पहिला श्लोक आहे.
म्हणजे जास्वंद भारतात किती वर्ष जुनं आहे ह्याचा अंदाज येईल.
पण आशियात इतर ठिकाणीही ती सापडते, नव्हे जगभर ... उष्ण देशांत सापडते.
कदाचित चीन, हे जास्वंदीचे मूळ असावे असा एक अंदाज आहे. जास्वंद हे मलेशियाचे राष्ट्रीय फूल आहे.



गणपतीच्या पूजेत लाल वस्त्र, जास्वंदीसारखे लाल फूल, रक्तचंदन यांसारख्या लाल वस्तू वापरणे महत्त्वाचे मानले जाते. याचे कारण म्हणजे गणपतीचा वर्ण शेंदरी / लाल आहे. पूजेत वापरलेल्या वस्तूंच्या लाल रंगामुळे गणेशाचे तत्त्व मूर्तीकडे जास्त प्रमाणात आकृष्ट होते, असे समजले जाते.

अथर्वशीर्षात जास्वंदीचे वर्णन आहे.

देवळाबाहेर गणपतीसाठी जसे दुर्वाचे हार असतात, तसे लाल जास्वंदीचेही हार असतात.
त्यामुळेच लहानपणापासून जास्वंद मला आपलं भारतीय वाटायचं.

लहानपणी केलेल्या काही गंमती आठवतात.
वेडे असतो तेव्हा आपण.
चुकीचे करतो हे तेव्हा कळत नाही.

सोसायटीत, चाळीत, बंगल्याभोवती, घराच्या बाजूला, कंपाउंडच्या कडेला, बागेत, घराच्या गॅलरीत, गच्चीत सगळीकडे जास्वंद तेव्हा असायचीच .. आणि घरची फुलं देवासाठी, पूजेसाठी काढून आणणे हा सकाळचा एक आनंददायी कार्यक्रम असायचा. अजूनही अनेकांचा आहे.

जास्वंदीचं अगदी कोवळं पानं तोडलं की एक प्रकारचा चिक त्यातून येतो. तो हातावर चिकटतो आणि मग हात उलटा केला की ते पान लोलकासारखे हलते. तो आमचा खेळ असायचा. खूप पानं चिकटवायचो आम्ही हातावर.

जास्वंदीची पानं कुटली किंवा वाटली की हिरवा रंग येतो पाण्याला.. मग ते आमचे भातुकलीतले सरबत असायचे. जास्वंदीच्या फुलाचा रंगही उतरतो. पूर्वीतर पेंटिंगमध्ये ह्या झाडाचे, फुलांचे रंग वापरले जायचे. शाळेत वेगवेगळ्या पानांबद्दल माहिती असायची. जास्वंदीचे पान, छान डार्क हिरवे गार, थोडेसे जाडसर, दातेरी टोकं असलेले, थोडे मोठेच असते. त्या पानाच्या मागे रंग लावून, त्याचे ठसे घेऊन चित्र काढायचाही उद्योग असायचा घरी !



आमच्या सोसायटीतली काही आजी आजोबा मंडळी पहाटे लवकर उठून काळोखात फुलं तोडायला जायची. अगदी १५ फूट वाढलेल्या जास्वंदीच्या वरच्या फांदीवरची फुलं काढता नाही आली, की छत्री, काठी वगैरे घेऊन फांदी वाकवून अगदी ओरबाडून फुलं घ्यायचे. सगळी फुलं त्यांना स्वत:कडच्या

देवालाच हवी असायची. घरची फुलं हवीत, विकतची नकोत ह्यांना .. पण स्वत: झाडं लावणार नाहीत. आणि दुसऱ्यांनी लावलेल्या झाडावरची फुलं अशी चोरून न्यायलाही त्यांना काही वाटायचे नाही. हे कळल्यानंतर, मग आम्ही कळ्या आदल्या दिवशी संध्याकाळी तोडून आणत होतो. त्या पाण्यात ठेवल्या की दुसऱ्या दिवशी छान उमलायच्या. मोठ्या, लाल रंग डोकावणाऱ्याच कळ्या आणायच्या.. हिरव्या दिसणाऱ्या, मुक्या कळ्या आणायच्या नाहीत, तोडायच्या नाहीत अशी सक्त ताकीद असायची आईची आम्हाला.

थोडं मोठे झाल्यावर, जास्वंदीच्या फुलाची सविस्तर माहिती शाळेच्या पुस्तकांत होती.. म्हणजे, ५ पाकळ्या, त्या खालचा भाग, पुंकेसर, बीजांड वगैरे. त्यासाठी ब्लेडने ते फूल कापून, माय्रोस्कोप खाली ते पाहिल्याचे आठवते.

जास्वंदीचे फूल, सकाळी कसे .. प्रसन्नपणे, पूर्ण उमललेले असते. त्याचे सौंदर्य सोज्वळ वाटते. पण संध्याकाळी मात्र ते कोमेजते.

झाडाची जाडसर फांदी तिरकी कापून कुंडीत लावली की झाड येते, त्याला भरपूर ऊन आणि भरपूर पाणी लागते. अगदी चिखल नाही पण दिवसभर ओलावा असलेली जमीन असली की ते झाड जोमाने वाढते. भारतात प्रथम लाल जास्वंदच असायची. त्याच्या बिया नसायच्या. पण आता जवळ जवळ २३० प्रजाती निघाल्या आहेत. गुलाबी, केशरी, पिवळा, निळा, मिक्स, काळा, पांढरा असे कितीतरी रंग आता जास्वंदीत असतात आणि त्याच्या बियाही मिळतात.



जुनी घराभोवतीची झाडं उंच वाढायची, फांद्या कापत रहायला लागायचं, की परत नव्या जोमाने वाढायची. खूप वर्षं म्हणजे ५० वर्षंही जगायची, पण आता नवीन, कलमे केलेली जास्वंदीची झाडं, कुंडीतही छान वाढतात. त्यांची उंची वाढू न देता, त्याच्या आडव्या फांद्या वाढून, डेरेदार दिसेल असे ते वाढवतात. पण ती ५/६ वर्षांपेक्षा जास्त जगत नाही.



काही जण कडूनिंबाचे खत जमिनीत घालतात, काही फांद्या जमिनीत लावायच्या आधी त्यांच्या टोकाला हळद आणि दालचिनी लावून ठेवतात. त्यामुळे झाडाला कीड लागत नाही. झाडाची पाने पण रोज पाणी घालून स्वच्छ ठेवली, तरी कीड लागत नाही. पण कीड लागलीच तर लसूण घातलेले पाणी, किंवा साबणाचे पाणी फवारले त्या भागावर, तर ती कीड निघून जाते. काही औषधंही मिळतात त्यासाठी.

जास्वंदीच्या झाडाला इंग्रजीत shoe flower म्हणतात. चीनमध्ये नव्याने बूट आले तेव्हा जास्वंदीचं त्यावर पडलेलं उलटं फूल, कोणीतरी घासले तर, बूट पॉलिश केल्यासारखे चकाकायला लागले बूट. तेव्हापासून हे नांव पडले. जास्वंदीचा चहा जगभर प्रसिध्द आहे. केस गळतीवर जास्वंदीचे तेल वापरले जाते. पूर्वी बायका घरी पण तेल, जास्वंद, माका घालून, उकळवून, वापरत असत.
अनेक औषधांमध्ये जास्वंद वापरली जाते.

जास्वंदीला वास नसला तरी तिच्या गुणांमुळे तिला देव्हाऱ्यात स्थान मिळाले आहे., ती सतत फुलतच

रहाणार आणि कायम देव्हारा, सुशोभित करतच रहाणार हे नक्की!

मी काढलेली काही जास्वंदीची फुलं....







**.........चित्रा मेहेंदळे**